# शहीद पाटील यांच्या पाल्याचा शैक्षणिक खर्च विद्यापीठ करणार

## डी. टी. शिर्के : दु:खात शिवाजी विद्यापीठ परिवार सहभागी

■ लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : निगवे खालसा (ता. करवीर) येथील शहीद संग्राम पाटील यांच्या कुटुंबातील पाल्याने शिवाजी विद्यापीठ अधिविभाग अथवा संलग्न महाविद्यालयात प्रवेश घेतल्यास त्याचा संपूर्ण शैक्षणिक खर्च विद्यापीठाच्या वतीने करण्यात येईल, असे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी पाटील कुटुंबियांना आश्वस्त केले.



निगवे खालसा (ता. करवीर) येथील शहीद संग्राम पाटील यांच्या कुटुंबीयांचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी सांत्वन केले. यावेळी विलास नांदवडेकर, आर. व्ही. गुरव, आदी उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. शिर्के यांनी गुरुवारी (दि. २६) शहीद पाटील यांचे वडील शिवाजी पाटील यांची व त्यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली. शहीद पाटील यांनी देशाच्या संरक्षणासाठी आपल्या प्राणांची आहुती दिली. त्यांच्या या कार्याचा विद्यापीठ परिवारास अभिमान आहे. त्यांच्या हौतात्म्यामुळे पाटील कुटुंबीयांवर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. त्या दु:खात विद्यापीठ परिवार सहभागी आहे, अशा शब्दांत कुलगुरू डॉ. शिर्के यांनी शोकभावना व्यक्त केल्या आणि पाटील कुटुंबीयांचे सांत्वन केले. विद्यापीठातर्फे शहीद लष्करी, निमलष्करी जवान आणि शहीद पोलीस यांच्या अपत्यांना सर्व शैक्षणिक सुविधा मोफत उपलब्ध करून दिल्या असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, आदी उपस्थित होते.

# लकवा रुग्णाला मिळाले नवे जीवन

